MHAH220000322015

**नि. दि. दावा क्र. १/२०१५**
बापु वि. आत्माराम व इतर

आदेश
**(नि.क्र.१११ खाली)**

वादीने प्रस्तुतचा अर्ज मयत प्रतिवादी क्र. ६, १२, १७, १८ व २५ यांचे कायदेशीर वारस अभिलेखावर घेणेकरीता व त्या अनुषंगाने वाद पत्रात अनुषंगीक दुरुस्तीसाठी परवानगीकामी केलेला आहे.

२. प्रस्तुत अर्जातील अर्जदार यांचे कथनानुसार, प्रस्तुतचा दावा हा वादीने प्रतिवादींविरुद्ध वाटपासाठी व जाहीर ठरावासाठी दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्याचे कामकाज प्रलंबित असताना प्रतिवादी क्र.६ आप्पा बाबाजी राऊत हे दि.०९.०५.२०१९ रोजी मयत झाले आहेत. प्रतिवादी क्र. ६ यांची पत्नी देखील मयत झालेली आहे. प्रतिवादी क्र. ६ यांना १ मुलगा वारस आहे. प्रतिवादी क्र. ६ यांनी त्यांचे हयातीत दावा जमिन त्यांचे नातु ज्ञानदेव संभाजी राऊत, मोहन संभाजी राऊत यांची नावे लावलेली आहे. प्रतिवादी क्र. १२ हरिबा रामा राऊत हे दि. १०/०३/२०१९ रोजी मयत झालेले आहेत. प्रतिवादी क्र. १२ यांना ३ मुले व पत्नी वारस आहेत. प्रतिवादी क्र. १७ बाळासाहेब बापुराव राऊत हे दि. ०५/०८/२०१९ रोजी मयत झालेले आहेत. त्यांना पत्नी व दोन मुले वारस आहेत. प्रतिवादी क्र. १८ हरिबा आप्पा सायकर हे दि. २३/१०/२०२० रोजी मयत झालेले असून त्यांना ३ मुले वारस आहेत. प्रतिवादी क्र. २५ अनंता गेणा मेहेर हे दि. ०९/०१/२०२२ रोजी मयत झालेले आहेत. त्यांना २ मुले व पत्नी असे वारस आहेत. त्यामुळे वादीने प्रतिवादी क्र. ६, १२, १७, १८ व २५ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादीचे वतीने सदर अर्जावर म्हणणे दाखल करण्यात येवून त्यांनी हरकत दर्शविली आहे व त्यांच्या कथनानुसार वादीने सदरचा अर्ज फार उशिरा दिलेला आहे. उशीरमाफीचा अर्ज दिलेला नाही. अबेटमेंट सेट असाईडचा अर्ज दिलेला नाही. त्यामुळे वारस रेकॉर्डवर घेण्याचा अर्ज मंजुर करता येणार नाही. सबब, प्रतिवादींनी सदरचा अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. प्रस्तुतचा अर्ज वाचला. अर्जदार व प्रतिवादी यांच्या विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतच्या अर्जासोबत प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. प्रस्तुतचा दावा हा वादीने प्रतिवादींविरुद्ध वाटपासाठी व जाहीर ठरावासाठी दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. ६, १२, १७, १८ व २५ मयत झाल्याचे प्रतिवादींकडून नाकारण्यात आलेले नाही. अभिलेखावर प्रतिवादी क्र. ६, १२, १७, २५ व प्रतिवादी क्र. १२ चा वारस मुलगा बबन हरिभाऊ राऊत यांच्या मृत्यु प्रमाणपत्राच्या छायांकित प्रति दाखल केल्या आहेत. यावरुन सदर प्रतिवादी हे मयत झाल्याचे दिसत आहेत. प्रतिवादींनी अर्जात नमुद केलेले प्रतिवादीचे वारसदाराबद्दल आक्षेप नोंदवलेला नाही. त्यामुळे मयत प्रतिवादींचे वारसदार अभिलेखावर घेणे दाव्याच्या संपरिक्षेच्या दृष्टीने आवश्यक आहे. वादीने सदरचा अर्ज उशीर माफीचा अर्ज आणि दावा अबेटमेंट सेट असाईडच्या अर्जासह दिला नाही हे खरे आहे, परंतु वारस अभिलेखावर घेणेकामी याच अर्जामध्ये एकत्रीतरित्या वरील बाबींचा विचार करता येईल. वारस अभिलेखावर घेणेसाठी वादीने बराचसा विलंब केलेला आहे. त्यामुळे सदर प्रतिवादींविरुध्द दावा अबेट झालेला आहे. परंतु झालेला उशीरदेखील माफ करता येईल व अबेटमेंट सेटअसाईडदेखील याच अर्जात करता येईल. परंतु झालेल्या विलंबाबत आक्षेप घेणारे प्रतिवादी यांना योग्य तो अर्जाचा खर्च देणे योग्य होईल. म्हणुन वादीचा वारस अभिलेखावर घेण्याचा अर्ज खालीलप्रमाणे मंजुर करण्यात येतो.

## आदेश

१. प्रस्तुत अर्ज (नि.क्र.१११) खालीलप्रमाणे मंजुर करण्यात येत आहे.

२. मयत प्रतिवादीविरुध्द झालेला दावा अबेटचा आदेश रद्य करणेत येत आहे. वादीने केलेला विलंब देखील वादीने आक्षेप घेणारे प्रतिवादी यांना रक्कम रुपये ५,०००/– दिल्यानंतर माफ करण्यात येत आहे.

३. वरीलप्रमाणे खर्चाची रक्कम दिल्यानंतर वादीने अर्जात नमुद केलेले मयत प्रतिवादी यांचे वारस अभिलेखावर घेण्याची परवानगी देण्यात येत आहे.

४. वादीने सदर आदेशाची पुर्तता पुढील तारखेपर्यंत करावी आणि दाव्यात दुरुस्ती करुन दुरुस्ती वादपत्र दाखल करावे.

RAMRAO BABURAO RAUT
Digitally signed by RAMRAO BABURAO RAUT
Date: 2025.07.16 17:04:22 +0530

ठिकाण: कर्जत (आर. बी. राऊत)
दिनांक :१६/०७/२०२५ २ रे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
कर्जत, जि. अहमदनगर